# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर    **P.S.(ठाणे):** बंडगार्डन
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0377    **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/12/2024 01:19

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 8 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार    **Date From (दिनांक पासून):** 26/12/2024
**Time Period (कालावधी):**    **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/12/2024
**Time From (वेळेपासून):** 14:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 27/12/2024    **Time (वेळ):** 01:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/12/2024 01:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी    **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** ताडीवाला रोड , पोलीस चौकी येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** नंदकुमार प्रकाश कदम

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन क )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 403 बी/2 सुकवानी सेफीया,शनीमंदीरामागे,ताथवडे पुणे मुळ,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुपो आत्याळ, तागडहिंग्लज ,जिकोल्हापुर ,वाकड,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9922890009

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हसनअली गुलाब बारटक्के | | | 1. सरस्वती कपा हौसींग सोसा, प्लट नं 20 बिल्डींग नं 2 ,, ताडीवाला रोड, पुणे,बंडगार्डन, पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs ) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच दिलेली रक्कम2000/ रुपये | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी नंदकुमार प्रकाश कदम, वय- 39, सहा.पोलीस निरीक्षक, बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर सध्या रा. 403 बी/2 सुकवानी सेफीया, शनीमंदीरामागे, ताथवडे पुणे मुळ रा. मुपो आत्याळ ता.गडहिंग्लज जि.कोल्हापुर मो नं 9922890009

समक्ष फिर्याद लिहुन देतो की, मी सन 2013 मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोग, सरळसेवा परीक्षा अंतर्गत पोलीस उपनिरीक्षक या पदावर भरती झालेलो आहे. सध्या मी मे 2023 पासुन बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर आयुक्तालय येथे सहा.पोलीस निरीक्षक या पदावर असुन मी सध्या बंडगार्डन पोलीस स्टेशन अंतर्गत ताडीवाला रोड पोलीस चौकी प्रभारी म्हणुन 05/05/2023 पासुन काम करत आहे.

माझेकडे तक्रारदार नामे सुमैया सैफान बागवान यांचा फसवणुकी बाबतचा स्थानिक अर्ज क्रं 472/24 दिनांक 12/10/2024 अन्वये चौकशी कामी प्राप्त झाला होता. त्या तक्रारी अर्जाचे अनुषंगाने मी यातील गैरअर्जदार इसम नामे हसनअली गुलाब बारटक्के यांना समजपत्र देवुन चौकशीकामी बोलाविले होते. दिनांक 19/10/2024 रोजी अर्जचौकशी दरम्यान गैरअर्जदार हसनअली बारटक्के यांनी यातील तक्रारदार सुमैया बागवान यांना दिनांक 22/10/2024 रोजी आरटीजीएसने पैसे परत करतो असा लेखी जबाब दिला होता. परंतु आरोपी हसनअली बारटक्के यास पैसे देण्याची इच्छा नसल्याने व अटक टाळण्यासाठी हसनअली बारटक्के याने मा. सत्र न्यायालयात अटकपुर्व जामीनासाठी फौजदारी जामीन अर्ज नं 6422/2024 अर्ज दाखल केला. परंतु मा.सत्र न्यायालयाने आरोपी हसनअली बारटक्के याचा जामीनअर्ज नाकारला. यावरुन हसनअली बारटक्के हा तक्रारदार यांना पैसे परत करणार नसल्याचे दिसुन आल्याने मी आमचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र गायकवाड यांचे सोबत चर्चा करुन त्यांचे मार्फतीने हसनअली बारटक्के व त्याची आई नामे अंजना बारटक्के यांचेविरुध्द तक्रारी अर्जावरुन गुन्हा दाखल करण्याच्या पुर्व परवानगीकरीता दिनांक 14/10/2024 रोजी मा. पोलीस उपआयुक्त परीमंडळ -2 यांचेकडे प्रस्ताव पाठविला होता. सदर प्रस्तावास मा. पोलीस उपआयुक्त परीमंडळ- 2 यांनी पडताळणी करुन दिनांक 05/12/024 रोजी गुन्हा दाखल करण्याची परवानगी दिली. यावरुन बंडगार्डन पोलीस स्टेशन गुरनं 365/2024 भा.न्या.सं. 2023 कमल 314, 316(2), 318(4) अन्वये दिनांक 12/12/2024 रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने मी यातील आरोपी हसनअली बारटक्के यास चौकशीकामी वारंवार बोलावित होतो, परंतु आरोपी हसनअली बारटक्के हा चौकशीकामी येण्यास टाळाटाळ करीत होता. दिनांक 19/12/2024 रोजी बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे मला दिवसपाळी अधिकारी म्हणुन कर्तव्य असतांना मी आरोपी हसनअली बारटक्के यास चौकशी कामी बालाविले असता यातील आरोपी हसनअली बारटक्के हा समक्ष हजर झाला त्यावेळेस मी त्यास भा.ना.सु.सं 35(3) अन्वये नोटीस देवुन त्यावर त्याची सही घेवुन, त्याची चेहरेपटटी भरुन घेतली, मी आरोपी हसनअली याची चेहरेपटटी भरुन घेत असतांना आरोपी बारटक्के हा मला म्हणाला की, साहेब माझ्या आईला यामध्ये घेवुन नका मी तुमचे काय असेल ते करतो असे म्हणुन मी तुम्हाला आता लगेच गुगल पे करतो असे म्हणु लागला व मला लाचेचे आमीष दाखवु लागला. त्यावेळेस मी त्यास ओरडुन, मला पैसे नको तु त्या फिर्यादीचे पैसे देवुन टाक असे म्हणालो. यावर आरोपी हसनअली हा मला म्हणाला की, ठिक आहे साहेब मी तुम्हाला उदया येवुन भेटतो असे बोलुन निघुन गेला. त्यानंतर मी आमचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.गायकवाड यांचेसोबत चर्चा केली व आरोपी हसनअली हा मला उदया लाचेचे आमीष देण्याचा प्रयत्न करणार व ती लाच मला स्विकारायची नसल्याने मी आरोपी हसनअली गुलाब बारटक्के याचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे दिनांक 20/12/24 रोजी



Scanned with CamScanner

लेखी तक्रार केली. त्यावेळेस लाप्रवि विभागाचे पोलीस उपअधिक्षक श्री.दयानंद गावडे यांनी पोनि प्रसाद लोणारे यांना दोन पंचसाक्षीदारासह तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले.

त्यानंतर लाप्रवि विभागाचे पोनि प्रसाद लोणारे यांनी माझी व सापळा पथक यांची ओळख करुन दिली. त्यानंतर मी पोनि लोणारे यांना मी सांगीतले की, आज दुपारी आरोपी हसनअली याने माझ्या मोबाईलवर, साहेब कुठे आहे, येवु का आता असा मॅसेज पाठविला आहे, आणि मी त्याला अदयापावेतो रिप्लाय दिलेला नाही, पोनि लोणारे यांनी मला आरोपी हसनअली यास चौकीला आहे इतकाच मॅसेज पाठविण्यास सांगीतला व हसनअली तात्काळ येत असेल तर कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले म्हणुन मी हसनअली यास मॅसेज केला पोनि लोणारे यांनी तात्काळ करवाई करणेकामी मी व सापळा पथक असे सर्वजण शासकीय वाहनाने 17. 50 वा ताडीवाला रोड पोलीस चौकी येथे रवाना झालो. त्यानंतर ताडीवाला रोड पोलीस चौकी येथे आल्यावर माझे व पंच क्रं 1 श्री. सुदेश काळे, पुणे मनपा यांचे निवेदन व्हॉईसरेकॉड मध्ये रेकॉर्ड केले व आरोपी हसनअली याच्या फोन/मॅसेजची आम्ही सापळा पथक वाट पहात थांबलो, सुमारे 21.00 वाजेपर्यत आम्ही हसनअली याच्या फोन/मॅसेजची वाट पाहीली परंतु त्याचा काहीही रिप्लाय न आल्याने व येण्याची शक्यता नसल्याने मी व सापळा पथक पुन्हा लाप्रवि कार्यालयात परत आलो. दिनांक 21/12/024 रोजी मला दिवसपाळी अधिकारी म्हणुन कर्तव्य असल्याने व 22/12/2024 रोजी माझी साप्ताहीक सुटटी असल्याने पुढील कारवाई दिनांक 23/12/2024 रोजी करणेबाबत पोनि लोणारे यांना विनंती केली. यावरुन पुढील कारवाई ही दिनांक 23/12/2024 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

दिनांक 22/12/2024 रोजी मी घरी असतांना आरोपी हसनअली याने माझे मो क्रं 9922890009 यावर त्याचा मो नं 9371059577 वरुन मॅसेज करुन माझ्या पत्नीची तब्येत बरी नाही मी लवकरच भेटायला येतो म्हणुन मॅसेज केला. परंतु मी त्याला काहीही रिप्लाय दिला नाही. दिनांक 23/12/2024 रोजी सर्वानुमते आरोपी येतो अगर कसे हे पहाण्यासाठी व गुन्हयाच्या तपासकामी मी आरोपी हसनअली यास त्याची आई अंजना हिस घेवुन येण्याबाबत मॅसेज केला यावर आरोपी हसनअली याने मी सोलापुरला आहे दोन दिवसानंतर येतो असा मॅसेजचा रिप्लाय दिला. त्यानंतर दिनांक 25/12/2024 रोजी आरोपी याने मला त्याचा मो नं 9371059577 वरुन माझा मो नं 9922890009 फोन करुन मी उदया दुपारी येतो असे सांगीतले. मी सदरची बाब तात्काळ पोनि लोणारे यांना फोनव्दारे कळविली व पोनि लोणारे यांनी दिनांक 26/12/2024 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरविले.

दिनांक 26/12/2024 रोजी मी ताडीवाला रोड पोलीस चौकी येथे हजर असतांना सापळा पथक हे ताडीवाला रोड पोलीस चौकी येथे सुमारे 14.00 वा हजर झाले. त्यानंतर मी व सापळा पथक असे ताडीवाला रोड पोलीस चौकीच्या पहील्या मजल्यावरील रुममध्ये थांबलो व पोनि लोणारे यांनी मला पडताळणी कारवाईच्या सुचना देवुन पहीले पडताळणी कारवाई करणार असल्याचे सांगीतले त्यानंतर हसनअली बारटक्के हे नक्की येणार अगर कसे हे खात्री करण्यासाठी पोनि लोणारे यांनी मला हसनअली यास फोन करण्यास सांगुन फोन स्पिकरवर टाकण्यास सांगीतला, त्याप्रमाणे मी माझ्या मोबाईलवरुन हसनअली यांना फोन लावला परंतु आवाज येत नसल्याने फोन कट झाला, काहीवेळातच हसनअली याचा माझ्या मोबाईलवर फोन आला व थोडयावेळातच येतो असे सांगीतले सदरचा फोन हा पोनि लोणारे यांनी व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड करुन घेतला. त्यानंतर पडताळणी कारवाईकामी पंच क्रं 1 म्हणुन श्री.सुदेश काळे यांना माझे लेखनिक म्हणुन त्याचे टेबलवर बसविण्याचे ठरले व ठरल्याप्रमाणे या सर्व घटनाचे माझ्या मोबाईलमध्ये व्हीडीओ रेकॉर्डींग करण्यास सांगीतले. त्यानंतर माझे व पंच क्रं 1 यांचे व्हाईसरेकॉडर मध्ये निवेदन रेकॉर्ड करुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे युनिफार्मिचे उजव्या खिशात ठेवुन मी व पंच क्रं1 सुदेश काळे असे दोघे तळमजल्यावरील माझ्या केबीनमध्ये येवुन बसलो. ठरल्याप्रमाणे मी माझ्या खुर्चीवर बसलो व पंच क्रं 1 श्री.सुदेश काळे हे माझ्या बाजुला असलेल्या लेखनिक यांच्या खुर्चीवर जावुन बसले. त्यानंतर मी माझा मोबाईल फोन आरोपीच्या लक्षात येणार नाही अश्या पध्दतीने माझ्या टेबलावर मोबाईल स्डॅण्डवर ठेवला. थोडयाच वेळात आरोपी हसनअली हा त्याची आई अंजना हिला घेवुन माझ्या दालनात आला. मी तात्काळ माझ्या मोबाईमधील व्हीडीओ रेकॉर्डीग चालु केली, मी आरोपीच्या आईचे चेहरेपटटी फॉर्मवर अंगठा व सही घेवुन आरोपीची आई अंजना बारटक्के हिस केबीनच्या बाहेर बसण्यास सांगीतले. त्यानंतर आरोपी हसनअली हा मला गुन्हयात सहकार्य करण्याबाबत विनंती करुन लागला यावर मी हसनअली यास तु गुन्हयाच्या तपासात सहकार्य कर असे म्हणु लागलो. आमची गुन्हयाच्या बाबतीत चर्चा होत असतांना आरोपी हसनअली हा अचानक उठुन उभा राहीला व त्याने त्याचे खिशातुन पैसे काढुन गुन्हयात सहकार्य करा असे बोलुन लाचेचे आमीष दाखवुन पैसे देण्याचा प्रयत्न केला यावर मी त्यास मोठयाने ओरडुन पैसे खिशात ठेवा असे बोललो यावर आरोपी हा थोड प्लीज समजुन घ्यांना सर मी जरा लय अडचणीत असे म्हणाला त्यावर मी त्यांना तुम्ही थोडावेळ बाहेर थांबा असे बोलुन मी पुन्हा ठरल्याप्रमाणे पहील्यामजल्यावर थांबलेल्या सापळा पथकाजवळ आलो. लागलीच पोशि/भुषण ठाकुर यांनी माझ्याकडील व्हाईस



Scanned with CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर पोनि लोणारे यांनी सदरचे संभाषण पंचासमक्ष फास्ट फॉरवर्ड करुन एकले असता सदर संभाषणामध्ये हसनअली बारटक्के हे मला लाचेचे आमिष देत असल्याबाबत खात्री झाल्याने पोनि प्रसाद लोणारे यांनी उलट सापळा आजमविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पोनि लोणारे यांनी मला व पंच क्रं 1 यांना केबीनमध्ये थांबण्यास सांगुन पोशि/ ठाकुर यांनी डीजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे युनिफॉर्मच्या उजव्या खिशात ठेवुन दिला. तसेच पोनि लोणारे व पंच क्रं 2 श्री. निलेश काळे, मनपा पुणे व सापळा पथक असे माझ्या केबीनच्या आसपास कोणास संशय येणार नाही अश्या रितीने थांबुन राहीलो. काही वेळात हसनअली हे माझ्या केबीनमध्ये आले व मी त्यास पैसे का देतो, मी पैसे मागीतले का असे बोललो असता हसनअली म्हणाला की, नाय तुम्ही कुठ म्हणले सर ,मी कुठ म्हणल अस सर मागितले, नाय नाय अस म्हणुन मला ते कळल ना सर.....मी कोर्टामध्ये गेलो काय मला ,तस होणारचय ना सर तुम्ही पुढ सहकार्य करणार म्हणुन मी म्हणल पण मला मदत करा असे बोलुन त्यांचे खिशातील पैसे काढुन माझ्या टेबलावर असलेल्या फाईलवर पैसे ठेवले त्याचवेळेस मी सापळा पथकास ठरलेला इशारा केला असता लागलीच सापळा पथकाने माझ्या केबीनमध्ये येवुन माझेकडील डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केला व हसनअली बारटक्के यांना ताब्यात घेतले. त्यानंतर टेबलावर फाईलवर ठेवलेले पैसे पंच क्रं 2 यांना मोजण्यास सांगीलते असता, पाचशे रुपये दराच्या चार नोटा असे एकुण दोन हजार रुपये असल्याची त्यांची खात्री झाली. त्यामुळे हसनअली बारटक्के याने मला लाच दिल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मपोशि/वैशाली माकर यांनी पंच क्रं 2 यांचे समक्ष सदर लाचेच्या रकमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर नोंदवुन घेतले.

तरी हसनअली गुलाब बारटक्के, वय-45 धंदा- रिअल इस्टेट एजंट, रा.सरस्वती कपा हौसींग सोसा. प्लॅट नं 20 बिल्डींग नं 2 , ताडीवाला रोड, पुणे यांनी मला त्यांचे विरुध्द बंडगार्डन पोलीस स्टेशन गुरंनं 365/2024 भा.न्या. सं. 2023 कमल 314, 316(2), 318(4) प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयात त्यास मदत करण्यासाठी मला लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन नेमुन दिलेले कर्तव्य पार न पाडण्याकरीता आज दिनांक 26/12/2024 रोजी ताडीवाला पोलीस चौकी येथील माझे केबीनमध्ये 2000/- रुपये लाच दिली म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAVINDRA MANOHAR GAIKWAD(I (Inspector)) / PQBN72854

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्र
खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15 **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAVINDRA MAN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN72854



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner